# फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

पंजि. कार्यालय :- एफडीसीएम भवन, ३५९-बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर - ४४००३६

ईमेल: md@fdcm.nic.in, gmhqnagnag12@gmail.com

CIN:U45200MH1974SGCO17206

Ph.No.0712-2811963, 2811962

## एफडीसीएम लिमी., मधील वनरक्षक (वर्ग–3) या संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात

जाहिरात क्रमांक एफडीसीएम / 01 / 2019 दिनांक :–24.01.2019

व्यवस्थापकीय संचालक, एफ.डी.सी.एम.लिमिटेड, नागपूर, यांच्या अधिपत्याखाली दक्षिण व उत्तर चंद्रपूर प्रदेश (मिळुन) आणि नागपूर प्रदेश व जाखाका व वनीकरण प्रदेश (मिळुन) अंतर्गत विविध विभागातील वनरक्षक या संवर्गाचे रिक्त पदावर नियुक्तीसाठी आवश्यक पात्रता धारण करीत असलेल्या व एफडीसीएम लिमी., मध्ये भरतीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांकडुन दिनांक 25.1.2019 ते दिनांक 21.2.2019 या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे. प्रस्तुत भरतीचा सविस्तर तपशील व अभ्यासक्रम https://maharecruitment.mahaonline.gov.in तसेच www.fdcm.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**उपलब्ध पदांचा तपशिल :– अनुसुचित क्षेत्राबाहेर**
**दक्षिण चंद्रपूर प्रदेशाकरीता**

| कार्यालयाचे नांव | संवर्ग | पदाचे नाव | अजा | अज | विजाभज | | | | विमाप्र | इमाव | एसईबीसी | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अ | ब | क | ड | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| दक्षिण चंद्रपूर प्रदेश, चंद्रपूर (दक्षिण चंद्रपूर प्रदेश व उत्तर चंद्रपूर प्रदेश मिळुन) | वर्ग 3 | वनरक्षक | 2 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 8 | 3 | 2 | 17 |

वरील उल्लेखित पदाकरीता समांतर आरक्षण खालीलप्रमाणे आहे.

| विशेष समांतर आरक्षण | अजा | अज | विजाभज | | | | | विमाप्र | इमाव | एसईबीसी | खुले | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | एकूण | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| महिला 30% | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 2 | 1 | 1 | 6 |
| प्रकल्पग्रस्त 5% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 |
| भुकंपग्रस्त 2% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| माजी सैनिक 15 % | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 0 | 2 |
| अति उच्च गुणवत्ताधारक खेळाडू 5% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 |
| अंशकालीन कर्मचारी 10% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 |
| वनमजुर 10% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 |
| होमगार्ड 5% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| अनाथ 1% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| सर्वसाधारण | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 1 | 1 | 1 | 5 |
| एकूण | 2 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 2 | 0 | 8 | 3 | 2 | 17 |

**अनुसुचित क्षेत्रा अंतर्गत रिक्त पदसंख्याः– 4 दक्षिण चंद्रपुर प्रदेश**

| प्रवर्ग | समांतर आरक्षणांतर्गत पदे | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | महिला | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | माजी सैनिक | अति उच्च गुणवत्ताधारक खेळाडू | अंशकालीन कर्मचारी | वनमजुर | होमगार्ड | सर्वसाधारण | एकुण भरती करावयाची पदे |
| अनु. जमाती | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 4 |

टिपः– अनुसूचित क्षेत्रातील रिक्त पदे स्थानिक अनुसुचित जमातीचे उमेदवारांमधुनच भरावयाची आहेत. त्यामुळे अनुसुचित क्षेत्रातील रहिवासी असलेल्या अनुसुचित जमाती उमेदवारांचाच या पदासाठी विचार केला जाईल. स्थानिक अनुसुचित जमातीचा उमेदवार याचा अर्ज जे अनुसुचित जमातीचे उमेदवार स्वतः किंवा आई–वडील किंवा आजी–आजोबा संबधित जिल्हयाच्या अनुसुचित क्षेत्रामध्ये 26 जानेवारी,1950 पासुन सातत्याने वास्तव्य करीत आहेत.

**नागपूर प्रदेशाकरीता अनुसुचित क्षेत्राबाहेर**

| कार्यालयाचे नांव | संवर्ग | पदाचे नांव | अजा | अज | विजाभज | | | | | विमाप्र | इमाव | एसईबीसी | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अ | ब | क | ड | एकूण | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| नागपूर प्रदेश, नागपूर, (नागपूर प्रदेश, जाखाका व वनीकरण प्रदेश मिळुन) | वर्ग 3 | वनरक्षक | 7 | 5 | 3 | 0 | -1 | 1 | 3 | 2 | 9 | 7 | 11 | 44 |

वरील उल्लेखित पदाकरीता समांतर आरक्षण खालीलप्रमाणे आहे.

| विशेष समांतर आरक्षण | अजा | अज | विजाभज | | | | | विमाप्र | इमाव | एसईबीसी | खुले | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | एकूण | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| महिला 30% | 2 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 3 | 2 | 3 | 13 |
| प्रकल्पग्रस्त 5% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| भुकंपग्रस्त 2% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| माजी सैनिक 15 % | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 2 | 6 |
| अति उच्च गुणवत्ताधारक खेळाडू 5% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| अंशकालीन कर्मचारी 10% | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 5 |
| वनमजुर 10% | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 5 |
| होमगार्ड 5% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| अनाथ 1% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| सर्वसाधारण | 2 | 1 | 2 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 3 | 2 | 1 | 12 |
| एकूण | 7 | 5 | 3 | 0 | 0 | 0 | 3 | 2 | 9 | 7 | 11 | 44 |

2. पात्र उमेदवारांची स्पर्धात्मक लेखी परिक्षा मार्च, 2019 मध्ये आयोजित होण्याची शक्यता आहे. परिक्षेचा दिनांक एफ.डी. सी.एम.लिमिटेडच्या www.fdcm.nic.in व मे.महाऑनलाईन यांच्या https:// maharecruitment. mahaonline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याकरीता उमेदवाराने नियमित संकेतस्थळाची पाहणी करावी.

3. भरतीसाठी जाहिर केलेल्या रिक्त पदांच्या प्रवर्गवार संख्येत/आरक्षणात वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे. रिक्त पदांच्या प्रवर्गवार संख्येत/आरक्षणात बदल करण्याबाबत तसे सामाजिक/समांतर आरक्षणात बदल करण्याचे अधिकार किंवा भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर अंशतः/पूर्णतः रद्द करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालकांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही. वर नमुद केलेल्या प्रवर्गनिहाय पदसंख्येत जर कोणत्याही कारणास्तव बदल (वाढ किंवा कमी) झाल्यास त्याची माहिती एफ.डी.सी.एम.लिमिटेडच्या www.fdcm.nic.in व मे.महाऑनलाईन यांच्या https://maharecruitment.mahaonline. gov.in या संकेतस्थळावर देण्यात येईल.

4. महिला, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, माजी सैनिक, अतिउच्च गुणवत्ताधारक खेळाडु, अंशकालीन कर्मचारी, होमगार्ड व अनाथ यांचे समांतर आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहिल.

5. महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणा–या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच क्रिमीलेअरमध्ये मोडत नसल्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. अ.जा. व अ.ज. या प्रवर्गातील महिला उमेदवारांना आरक्षणाच्या लाभासाठी नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

6. वि.जा.–अ, भ.ज.–ब, भ.ज.–क, व भ.ज.–ड हे आरक्षित प्रवर्ग आंतरपरिवर्तनीय असुन आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलबध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

7. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक राक्रीधो–2002/प्र.क्र.68/क्रीयुसे–2 दिनांक 1 जुलै,2016 तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक राक्रीधो–2002/प्र.क्र.68/क्रीयुसे–2 दिनांक 18 ऑगष्ट 2016 आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडूच्या आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

7.1 प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाचा दावा करणा–या उमेदवारांच्या बाबतीत त्यांची क्रीडा विषयक प्रमाणपत्रे योग्य दर्जाची असल्याबाबत व तो उमेदवार खेळाडू प्रवर्गातील आरक्षित पदासाठी पात्र ठरतो याबाबत, एफ.डी.सी.एम.लिमिटेडकडे अर्ज सादर करण्यापूर्वीच सक्षम प्राधिका–याने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र प्राप्त केलेले असणे आवश्यक आहे.

8. समांतर आरक्षणाबाबत सामान्य प्रशासन विभाग,शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण–1118/प्र.क्र.39/16–अ दिनांक 19.12. 2018 आणि शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या दिशा निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

9. परिक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर, मागासवर्गीयासाठी विहित केलेली वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक अटी/निकषांसंदर्भात कोणतीही सूट/सवलत घेतली असल्यास अशा उमेदवारांची खुला (सर्वसाधारण) प्रवर्गातील पदावर निवड करण्यात येणार नाही. परीक्षा शुल्कामधील सवलत ही या प्रयोजनासाठी सवलत समजली जाणार नाही.

10. अमागास उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषांसंदर्भात अटींची पूर्तता करणा–या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) खुला (सर्वसाधारण) पदावरील निवडीकरीता विचार होत असल्याने, सर्व मागास आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मुळ आरक्षण प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमुद करणे बंधनकारक आहे.

11. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी उत्तरे दिली जाणार नाही.

12. **वनरक्षक या पदाची वेतनश्रेणी** (सहावे वेतन आयोगानुसार):– रू. 5200–.20200 अधिक ग्रेड पे रू.1800 व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते

13. **पात्रताः**

13.1 भारतीय नागरिकत्व

13.2 महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी (सक्षम प्राधिका–याने दिलेला पुरावा सादर करणे आवश्यक राहिल)

13.3 **शैक्षणिक अर्हताः**

(अ)उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा विज्ञान विषयातून 50% गुणांसह उत्तीर्ण. उमेदवाराने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मराठी भाषा या विषयासह उत्तीर्ण केलेली असावी किंवा उमेदवाराने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या समकक्ष मराठी भाषा अभिज्ञ (सूपरिचित ) असल्याबाबत कोणत्याही मान्यता प्राप्त मंडळाचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक.

H.S.C. or its equivalent in science with minimum of 50% marks. The candidates shall have Marathi language in S.S.C. or shall have certificate of any recognized Board to the effect that the candidate is conversant in Marathi language equivalent to S.S.C. Board.

13.4 **शारीरीक मानके :–**

| शारीरीक माप | उमेदवाराचा प्रवर्ग | |
|---|---|---|
| | पुरूष | स्त्री |
| उंची (से.मी.मध्ये) | 163 | 150 |
| छातीचा घेर–<br>न फुगवता (से.मी.मध्ये)<br>फुगवून (से.मी.मध्ये) | <br>79<br>84 | <br>74<br>79 |
| अनुसूचित जमाती मधील उमेदवारासाठी उंची खालील प्रमाणे शिथिलक्षम | | |
| उंची (से.मी.मध्ये) | 152.5 | 145 |

टिपः– उपरोक्त शारीरीक मानके धारण न करणा–या उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करू नये असा सल्ला देण्यात येत आहे.

13.5 सूधारणेनंतर (ऑफ्टर करेक्शन) +4.00 सह प्रत्येक डोळयाची दृष्टीतीक्ष्णता (व्हिज्यूएल ऍक्वीटी) 6/6 असावी. बाहय डोळयावर कोणतेही रोग संक्रमण झालेले नसावे किंवा तिरळेपणा नसावा.

Visual acuity 6/6 each eye with +4.00D after correction.

13.6 शासकीय वैद्यकीय अधिकारी किंवा वैद्यकीय तपासणी संदर्भात प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय विशेषज्ञांकडून वैद्यकीय चाचणीमध्ये तिरळेपणा, रंग व रात आंधळेपणा, आतल्या बाजूला फेंगाडे असलेले गुडघे, सपाट पाय, त्वचा व छातीचे रोग या संबधिताचा आणि नियुक्ती प्राधिकारी यांनी वेळोवेळी विहित केलेल्या अन्य वैद्यकीय चाचणीचा समावेश राहिल.

13.7. **वयोमर्यादा** :–(उमेदवाराची वयाची गणना दि 1 फेब्रुवारी, 2019 ला करण्यात येईल.)

| किमान वयोमर्यादा वर्ष | कमाल वयोमर्यादा (वर्ष) | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अमागास (वर्ष) | मागासवर्गीय | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक,आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी | | अनाथ | प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त | अंशकालीन कर्मचारी / वनमजुर |
| | | | अमागास | मागासवर्गीय | अमागास | मागासवर्गीय | | | |
| 18 | 25 | 30 | 30 | 30 | 45 | 45 | 25 | 45 | 46 |

विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथील केली जाणार नाही.

13.8 उमेदवारांना मराठी लिहिता,वाचता,बोलता येणे अत्यावश्यक आहे.

**14. सेवाप्रवेशोत्तर शर्ती:–**

वनरक्षक पदावर नियुक्त उमेदवारांना वन विभागाच्या वनरक्षक प्रशिक्षण संस्थेतील 6 महिने कालावधीचा प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील.

**15. निवडीची पध्दत :**

**15.1 टप्पा–1 : लेखी परिक्षा :**

(1) वनरक्षक भरतीच्या जाहिरातीच्या अनुषंगाने संबंधीत उमेदवार हे फक्त कोणत्याही एका प्रदेशाकरीता फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज करु शकेल. एकापेक्षा जास्त प्रदेशाकरीता अर्ज केल्याचे आढळल्यास पहिला सादर केलेला वैध अर्ज ग्राहय धरुन इतर अर्ज रद्द समजण्यात येतील. अपंग उमेदवार वनरक्षक भरती करीता पात्र नाही.

(2) उमेदवाराने ज्या प्रदेशाकरीता अर्ज केला आहे. त्याची उमेदवारी फक्त त्या प्रदेशाकरीता मर्यादीत राहील.

(3) उमेदवाराने अर्जात नमुद केलेली माहिती खरी आहे असे गृहित धरून त्यांच्या जबाबदारीवर उमेदवाराला स्पर्धात्मक लेखी परीक्षा देण्यास पात्र ठरविण्यात येईल. तथापि, उमेदवाराने दस्ताऐवज तपासणीच्या वेळी मुळ दस्ताऐवज सादर करणे आवश्यक राहिल.

(4) सर्व उमेदवारांची 120 गुणांची स्पर्धात्मक लेखी परिक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षा ही पूर्ण राज्यात एकाच दिवशी घेण्यात येईल. प्राप्त झालेल्या अर्जांच्या संख्येचा विचार करुन लेखी परिक्षा ही ऑनलाईन पध्दतीने

किंवा ओ.एम.आर. शीट वर घेण्यात येईल. प्रत्येक बरोबर उत्तराकरीता 1 गूण देण्यात येईल व प्रत्येक चूकीच्या उत्तराकरीता 0.25 गूण कपात करण्यात येईल. (Negative Marking)

(5) स्पर्धात्मक लेखी परिक्षेचा दर्जा हा उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा (HSC) दर्जाचा राहिल. मात्र मराठी व इंग्रजी भाषा विषयक प्रश्नांचा दर्जा माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा (SSC) दर्जाचा राहिल. लेखी परिक्षेमध्ये खालीलप्रमाणे विषयांचा प्रामुख्याने समावेश राहिल.

| अ.क्र. | विषय | प्रश्नांची संख्या | गुण |
|---|---|---|---|
| 1 | सामान्य ज्ञान<br>(भारत व विशेषतः महाराष्ट्र राज्याचा इतिहास व भूगोल, भारतीय संविधान, सामान्य विज्ञान, हवामान, क्रिडा, संस्कृती, चालु घडामोडी, जैव विविधता, वने, वन्यजीव, पर्यावरण संतुलन, माहिती अधिकार अधिनियम 2005, इ.) | 40 | 40 |
| 2 | बौध्दिक चाचणी<br>(अ) संख्यात्मक योग्यता:<br>शेकडेवारी, सरासरी गुणोत्तर आणि प्रमाण, व्याज, नफा व तोटा, सुट, काळ, काम व वेग, संख्या पध्दती, भुमिती, सांख्यिकी,<br>(ब) तार्कीक क्षमता<br>संकेत आणि संकेत उलगडणे आणि वर्गीकरण, लघु आणि कॅपिटल अक्षर/संख्या सांकेतिक करणे, सांकेतिक/संख्या सादृश्य साधर्म्य आणि भिन्नता, शब्द मांडणी, आप्तसंबंध, इ.) | 20<br><br>20 | 20<br><br>20 |
| 3 | मराठी भाषा<br>(सर्वसाधारण शब्द संग्रह, विरामचिन्हांकन, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्यप्रचार यांचा अर्थ आणि वाक्यात उपयोग) | 20 | 20 |
| 4 | इंग्रजी भाषा<br>(Spelling, Common Vocabulory, Punctuation, Expressions, Simple Sentence Structure, Grammar, Use of Idioms and phrases & their meaning) | 20 | 20 |
| | एकुण | 120 | 120 |

(6) सदर लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रीका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी उत्तर (Multiple choice type) अशा स्वरुपाची राहिल.

(7) लेखी परीक्षेचा निकाल जाहिर करणे:– स्पर्धात्मक लेखी परिक्षेच्या निकालाच्या आधारावर प्रादेशिक निवड समितीकडून प्रवर्गनिहाय रिक्त पदांचे **1:5 या प्रमाणात** उमेदवारांना पुढच्या टप्प्याकरीता पात्र ठरविण्यात येईल.

म्हणजे प्रत्येक प्रवर्गाचे एका रिक्त पदाकरीता त्या प्रवर्गाच्या 5 उमेदवारांची गुणवत्तेनुसार पुढच्या टप्प्याकरीता निवड करण्यात येईल व त्याची यादी महाऑनलाईन तसेच एफडीसीएम लिमी., चे वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. इतर उमेदवार या स्तरावरुन भरती प्रक्रियेतुन बाद होतील.

**15.2 टप्पा 2 : उमेदवारांचे दस्तावेजांची तपासणी**

स्पर्धात्मक लेखी परिक्षेच्या आधारे प्रवर्गनिहाय निवड केलेल्या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, आरक्षण प्रवर्ग व नॉन–क्रिमिलेयर, इ. बाबत उमेदवारांच्या मूळ दस्ताऐवजांची सक्षम प्राधिकाऱ्यांकडून तपासणी करण्यात येईल. जे उमेदवार दस्तावेजाप्रमाणे पात्र ठरतील ते भरती प्रक्रियेचा पुढील टप्पा म्हणजे शारीरिक पात्रता तपासणी करीता पात्र ठरतील. जे उमेदवार पात्रतेकरीता आवश्यक दस्तावेज सादर करणार नाहीत, ते या स्तरावरुनच भरती प्रक्रियेतुन बाद होतील.

**15.3 टप्पा 3 : उमेदवारांची शारीरिक पात्रता तपासणी**

वनरक्षक पदाच्या प्रचलित सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवार किमान शारीरिक पात्रता (उंची व छातीचे मापदंड) धारण करतात किंवा कसे यासाठी शासकीय वैद्यकीय अधिकारी किंवा निवड समितीने नेमलेले वैद्यकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत उमेदवारांची शारीरिक मोजमापे घेण्यात येतील. जे उमेदवार शारीरिक पात्रता तपासणी मध्ये पात्र ठरतील ते भरती प्रक्रियेचा पुढील टप्पा म्हणजे धाव चाचणी करीता पात्र ठरतील. जे उमेदवार शारीरिक पात्रता तपासणी मध्ये पात्र ठरणार नाहीत, ते या स्तरावरुनच भरती प्रक्रियेतुन बाद होतील.

**15.4 टप्पा 4 : उमेदवारांची धाव चाचणी**

पदासाठी अर्हता विषयक दस्तावेजांची तपासणी तसेच शारीरिक मोजमापामध्ये पात्र ठरलेले उमेदवारांची धाव चाचणी घेण्यात येईल. सदर धावण्याच्या चाचणीकरीता शारीरिकदृष्टया सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधीत उमेदवाराने कोणत्याही पंजीकृत वैद्यकीय अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेवून धावण्याच्या चाचणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरीता पात्र ठरण्यासाठी पुरुष उमेदवाराने 5 कि.मी. धावण्याची चाचणी अधिकतम 30 मिनिटात आणि महिला उमेदवाराने 3 कि.मी. धावण्याची चाचणी अधिकतम 25 मिनिटात पूर्ण करणे आवश्यक राहील. उपरोक्त विहीत कालमर्यादेत धावण्याची चाचणी पूर्ण न करु शकणारे उमेदवार या स्तरावरुन भरती प्रक्रियेतुन बाद होतील.

सदर धावण्याच्या चाचणीत नोंदविलेल्या वेळेचे अनुषंगाने चाचणीत भाग घेतलेल्या उमेदवारांना खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे गुण देण्यात येतील.

(अ) पुरुष उमेदवारांची 5 कि.मी. अंतर धावण्याची चाचणी (एकूण गुण : 80)

| अ. क्र. | धावण्याची चाचणी पूर्ण करण्यासाठी लागलेला कालावधी (मिनिटामध्ये) | अनुज्ञेय गुण |
|---|---|---|
| 1 | 17 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 80 |
| 2 | 17 मिनिट पेक्षा जास्त परंतु 18 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 70 |

| | | |
|---|---|---|
| 3 | 18 मिनिट पेक्षा जास्त परंतु 19 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 60 |
| 4 | 19 मिनिट पेक्षा जास्त परंतु 20 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 50 |
| 5 | 20 मिनिट पेक्षा जास्त परंतु 21 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 45 |
| 6 | 21 मिनिट पेक्षा जास्त परंतु 22 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 40 |
| 7 | 22 मिनिट पेक्षा जास्त परंतु 23 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 35 |
| 8 | 23 मिनिट पेक्षा जास्त परंतु 24 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 30 |
| 9 | 24 मिनिट पेक्षा जास्त परंतु 25 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 25 |
| 10 | 25 मिनिट पेक्षा जास्त परंतु 26 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 20 |
| 11 | 26 मिनिट पेक्षा जास्त परंतु 27 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 15 |
| 12 | 27 मिनिट पेक्षा जास्त परंतु 28 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 10 |
| 13 | 28 मिनिट पेक्षा जास्त परंतु 29 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 5 |
| 14 | 29 मिनिट पेक्षा जास्त परंतु 30 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 1 |
| **30 मिनिटांमध्ये 5 कि.मी. धावू न शकणारा पुरुष उमेदवार भरती प्रक्रियेतुन बाद होईल.** | | |

(ब) महिला उमेदवारांची 3 कि.मी. अंतर धावण्याची चाचणी (एकूण गुण : 80)

| अ. क्र. | धावण्याची चाचणी पूर्ण करण्यासाठी लागलेला कालावधी (मिनिटामध्ये) | अनुज्ञेय गुण |
|---|---|---|
| 1 | 12 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 80 |
| 2 | 12 मिनिट पेक्षा जास्त परंतु 13 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 70 |
| 3 | 13 मिनिट पेक्षा जास्त परंतु 14 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 60 |
| 4 | 14 मिनिट पेक्षा जास्त परंतु 15 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 50 |
| 5 | 15 मिनिट पेक्षा जास्त परंतु 16 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 45 |
| 6 | 16 मिनिट पेक्षा जास्त परंतु 17 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 40 |
| 7 | 17 मिनिट पेक्षा जास्त परंतु 18 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 35 |
| 8 | 18 मिनिट पेक्षा जास्त परंतु 19 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 30 |
| 9 | 19 मिनिट पेक्षा जास्त परंतु 20 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 25 |
| 10 | 20 मिनिट पेक्षा जास्त परंतु 21 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 20 |
| 11 | 21 मिनिट पेक्षा जास्त परंतु 22 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 15 |
| 12 | 22 मिनिट पेक्षा जास्त परंतु 23 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 10 |
| 13 | 23 मिनिट पेक्षा जास्त परंतु 24 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 5 |
| 14 | 24 मिनिट पेक्षा जास्त परंतु 25 मिनिट किंवा त्यापेक्षा कमी | 1 |
| **25 मिनिटांमध्ये 3 कि.मी. धावू न शकणारी महिला उमेदवार भरती प्रक्रियेतुन बाद होईल.** | | |

(क) दस्ताऐवजांची तपासणी, शारीरिक मोजमाप तपासणी व धावण्याची चाचणी या सर्व प्रक्रियेचे वेळापत्रक वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

(ड) दस्तावेजांची तपासणी, शारीरिक मोजमाप तपासणी व धावण्याची चाचणी या तिन्ही टप्प्यांमध्ये अपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी महाऑनलाईन व एफडीसीएम लिमी., चे वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

**15.5** वनरक्षक पदाकरीता उमेदवारांची निवड करतांना मौखिक परीक्षा (मुलाखत) घेण्यात येणार नाही.

**15.6 टप्पा : 5 सर्वसाधारण गुणवत्ता यादी तयार करणे :**

सर्व टप्प्यात पात्र ठरविलेले पुरुष/महिला उमेदवारांचे स्पर्धात्मक लेखी परिक्षेत प्राप्त गुण व त्यांना अनुक्रमे 5 कि.मी. व 3 कि.मी. धाव चाचणीत प्राप्त झालेले गुण यांची एकत्रित बेरीज करुन सर्वसाधारण गुणवत्ता यादी महाऑनलाईन व एफडीसीएम लिमी., चे वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

**15.7 टप्पाः 6 प्रोव्हीजनल निवड यादि जाहिर करणेः**

निवड समिती सर्वसाधारण गुणवत्ता यादिवरून प्रोव्हीजनल निवड यादि तयार करेल. प्रवर्गनिहाय प्रोव्हीजनल निवड सूची आणि गुणवत्ताक्रमानुसार सामाईक निवडसूची (Common Select List) अशा दोन याद्या तयार करण्यात येईल व अशा दोन याद्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**15.8 टप्पा 7 :** वनरक्षक पदासाठी सर्वसाधारण गुणवत्ता यादीतील पुरुष उमेदवारांची 4 तासात 25 कि.मी. व महिला उमेदवारांना 4 तासात 16 कि.मी. चालण्याची शारीरिक क्षमता चाचणी घेण्यात येईल. सदर चाचणीद्वारे विहीत केलेले अंतर उमेदवारांनी चालुन किंवा धावुन किंवा चालुन व धावुन जास्तीत जास्त 4 तासात पूर्ण करणे आवश्यक आहे. जे उमेदवार सदर चाचणी विहीत वेळेत पूर्ण करु शकणार नाही ते भरती प्रक्रियेतुन बाद ठरतील व प्रोव्हिजनल निवड यादीतुन त्यांचे नाव वगळण्यात येईल व अशा शारीरीक क्षमता चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचे नाव समाविष्ठ करून निवड यादी अंतिम करण्यात येईल व प्रवर्गवार अंतिम निवड यादि तसेच सामाईक निवड यादि महाऑनलाईन व एफडीसीएम लिमी., चे वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

**15.9 टप्पा क्रमांक 8: वैद्यकीय फिटनेस तपासणी करून घेवुन नियुक्ती आदेश जारी करणे.**

निवड समितीने शिफारस केलेल्या निवड यादिच्या आधारावर नियुक्ती प्राधिकारी हे उमेदवारांची ते वनरक्षक पदासाठी वैद्यकीयदृष्टया पात्र असल्याबाबत शासकीय वैद्यकीय अधिकारी यांचेकडून वैद्यकीय तपासणी करून घेतील व पात्र उमेदवारांचे नियुक्तीचे आदेश जारी करतील.

16. उमेदवारांची लेखी परीक्षा, दस्ताऐवजांची तपासणी, शारिरिक पात्रता तपासणी, धाव चाचणी आणि शारिरिक क्षमता चाचणी सक्षम प्राधिकाऱ्यांकडून निश्चित करण्यात आलेल्या कार्यक्रमानूसार तसेच निश्चित केलेल्या ठिकाणी व विहीत वेळेत घेण्यात येईल. त्याकरीता उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

17. **परीक्षा शुल्क** : अमागास (खुला) उमेदवाराकरीता रू. 600/ मागासवर्गीय उमेदवाराकरीता रू.400/-

18. **अर्ज करण्याची पध्दत :-**

18.1 प्रस्तुत परीक्षेसाठी फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारण्यात येतील.

18.2 पात्र उमेदवाराला वेब-आधारीत (Web-based) ऑनलाईन अर्ज https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळाव्दारे दिनांक 25.01.2019 ते दिनांक 21.02.2019 पर्यंत सादर करणे आवश्यक राहील.

18.3 ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना https://maharecruitment.mahaonline.gov.in तसेच www.fdcm.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

18.4 ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराने स्वतःचा अद्ययावत फोटो (रुंदी ३ से.मी.x उंची 4.5 से.मी.) व स्वतःची स्वाक्षरी (रुंदी 3 से.मी.x उंची 2.5 से.मी.) आणि 300 DPI Resolution आणि 50 k.b.पेक्षा कमी साईज होईल अशा विहित पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे. (टीपः फोटो व स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवाराने त्यांचाच फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी. प्रवेश पत्रावर/अर्जावर दुस-याचा फोटो/ स्वाक्षरी आढळल्यास उमेदवारांना परिक्षेमध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

18.5 एफडीसीएम लि.ला चुकीची माहिती सादर करणाऱ्या उमेदवारास परीक्षेसाठी व यापुढील सर्व निवडीकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

18.6 अर्ज ऑनलाईन अथवा महा ई-सेवा केंद्राद्वारे भरता येतील. महाऑनलाईन लिमिटेड या संस्थेकडून प्रत्येक जिल्हयात महा ई-सेवा केंद्र उघडण्यात आलेले आहेत. या महा ई-सेवा केंद्राची यादी www.mahaonline.gov.in किंवा https://maharecruitment. mahaonline.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. उमेदवाराने यापूर्वी maharecruitment.gov.in या वेबसाईट वर आपले खाते तयार केलेले नसल्यास उमेदवारास "नवीन वापरकर्ता नोंदणी" वर क्लिक करुन युजर नेम व पासवर्ड तयार करावा लागेल.

18.7 त्यानंतर उमेदवारास "प्रोफाईल निर्मिती" मध्ये जावुन स्वतःची संपूर्ण माहिती भरावी लागेल. www.mahaonline.gov.in या वेबसाईटवर यापूर्वी "प्रोफाईल निर्मिती" मध्ये जावून स्वतःची संपूर्ण माहिती भरलेली असल्यास पुन्हा माहिती भरायची आवश्यकता नाही. उमेदवार स्वतःची प्रोफाईल मधील माहिती कधीही अद्ययावत करु शकतो.

18.8 उमेदवाराने युजर नेम व पासवर्डची नोंद करुन लॉगिन केल्यानंतर अर्ज सादर करावयाच्या कार्यालयाच्या लिंक वर क्लिक करावे. त्या कार्यालयांतर्गत उपलब्ध जाहिरातील "अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा" हा संदेश दाखविल्या जाईल . क्लिक केल्यानंतर आपण जाहिरातीत नमूद शैक्षणिक पात्रता/अनुभव/इतर बाबीची पूर्तता करत असल्यास आपला अर्ज स्वीकारला जाईल. अन्यथा आपला अर्ज दाखल न होण्याचे कारण दाखविले जाईल.

18.10 ज्या उमेदवारांना इंटरनेटद्वारे स्वतः अर्ज भरावयाचा नसेल असे उमेदवार महा ई-सेवा केंद्रामार्फत आपला अर्ज भरु शकतात. त्याच वेळेस उमेदवाराकडून परीक्षा शुल्क व रु.25/-एवढी रोख रक्कम घेतली जाईल. उमेदवारास पैसे भरल्याची पावती (receipt) महा ई-सेवा केंद्रातर्फे देण्यात येईल. या सुविधेमध्ये आवेदन अर्ज भरणे व पैसे भरल्यानंतर पैसे भरल्याची पावती देणे याचा समावेश असेल.फोटो/स्वाक्षरी स्कॅन किंवा अर्जाच्या प्रिंट करीता स्वतंत्र रक्कम केंद्र चालकाकडून आकारली जाईल.

19 स्वतः ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणारे उमेदवार निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पध्दतीने भरु शकतील.

(i) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (२) नेटबँकींग (३) डेबीट कार्ड (४) क्रेडिट कार्ड द्वारे

20. अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

21. **परीक्षाशुल्काचा भरणा करण्या करिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पध्दतींचा अवलंब करावा. :-**

21.1 युजर नेम व पासवर्डची नोंद करुन लॉगिन केल्यानंतर मुख्य पृष्ठाच्या वरील भागातील माझे खाते या लिंक वर क्लिक करावे.

21.2 " माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नाव निवडल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या/ न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर "unpaid" असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी "Pay Now" अशी लिंक उपलब्ध असेल.

21.3 "Pay Now" या लिंक वर क्लिक केल्यानंतर २ पर्याय उपलब्ध होतील. (अ) ऑनलाईन पेमेंट (ब)चलनाव्दारे

21.4 उमेदवारांना क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल. ऑनलाईनद्वारे परीक्षा शुल्क अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांक 21.2.2019 पर्यंत पूर्ण करणे आवश्यक राहील

21.5. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (status) अवगत होईल. त्याची उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांका

पूर्वीच तपासणी करुन खात्री करणे आवश्यक आहे. विहित दिनांकानंतर यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही

21.6 चलनाव्दारे परीक्षा शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास उपलब्ध होणाऱ्या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.चलनाद्वारे शुल्क स्विकारण्याकरीता भारतीय स्टेट बँक उमेदवारांकडून परीक्षा शुल्क व्यतिरिक्त सेवाशुल्क आकारेल. उमेदवारास चलनाद्वारे शुल्क भरतांना परीक्षा शुल्क व सेवाशुल्क बँकेकडे भरणा करावे लागेल.

21..7 भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन चलनाव्दारे परिक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २२.२.२०१९ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**22. प्रवेश प्रमाणपत्र :-**

22.1 प्रस्तुत परीक्षेपुर्वी सर्वसाधारणपणे ७ दिवस अगोदर प्रवेशप्रमाणपत्र उमेदवाराच्या प्रोफाईलव्दारे https:// maharecruitment. mahaonline.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपुर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

22.2 परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

22.3 परीक्षेस येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड, किंवा स्मार्ट कार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स, मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्थेकडून जारी केलेला फोटो ओळखपत्र यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र व त्याची एक छायांकीत प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**23. परीक्षेस प्रवेश**

23.1 उमेदवाराला फक्त पेन, पेन्सिल, प्रवेशप्रमाणपत्र, ओळखीचा मूळ पुरावा व त्याची एक छायांकीत प्रत अथवा प्रवेश प्रमाणपत्रावरील सूचनेनुसार महाऑनलाईनने/एफडीसीएम लि.ने परवानगी दिलेल्या साहित्यासह परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल. त्याशिवाय इतर कोणतेही साहित्य परीक्षा कक्षात सोबत घेवुन जाण्यास अनुमती राहणार नाही.

24.2 डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वह्या,नोट्स, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (Calculator) इत्यादी प्रकारची साधने / साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उ मेदवाराची राहील. यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस महाऑनलाईन/एफडीसीएम लिमिटेड किंवा शाळा/महाविद्यालय व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

24.3 मे.महाऑनलाईन/एफडीसीएम लि.च्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

**व्यवस्थापकीय संचालक**

## प्रपत्र–1

## वनरक्षक पदाच्या उमेदवाराने धाव चाचणीच्या वेळी द्यावयाचे वचनपत्र

वनरक्षक पदभरती 2019 मध्ये मी खाली सही करणार वचनपत्र लिहून देतो की, वनरक्षक पदभरती 2019 मध्ये मी उमेदवार म्हणून आवेदनपत्र दाखल केले आहे. उपरोक्त भरती प्रक्रियेचा भाग म्हणुन शारीरीक क्षमता धाव चाचणीमध्ये 5 कि.मी. (पुरूष उमेदवारास) 30 मिनिटात / 3 कि.मी. (महिला उमेदवारास) 25 मिनिटात पूर्ण करण्याच्या धाव चाचणीमध्ये स्वेच्छेने सहभागी होत आहे. सदरहू धाव चाचणी करीता मी शारीरीकदृष्टया सक्षम आहे. उपरोक्त शारीरीक क्षमता धाव चाचणी दरम्यान माझी शारीरीक वा कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास, त्यास एफ.डी.सी.एम.लिमिटेड जबाबदार राहणार नाही.

करीता हे वचनपत्र लिहू देण्यात येत आहे.

ठिकाणः उमेदवाराची स्वाक्षरी

उमेदवाराचे पुर्ण नावः

दिनांक

## प्रपत्र–2

## वनरक्षक भरती प्रक्रिया सन 2019

## शारीरीकदृष्टया सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र

1 उमेदवार क्रमांक (I.D.No.) ---------------------------

2 उमेदवाराचे संपुर्ण नावः ............................................................................................ उमेदवाराचा फोटो

3 पदाचे नावः वनरक्षक गट–क

धाव चाचणीपूर्वी उमेदवार हे धावण्यासाठी शारीरीकदृष्टया सुदृढ असल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/कु. .................................................................................................................. हे पुरूष उमेदवाराकरीता 5 कि.मी. /महिला उमेदवाराकरीता 3 कि.मी.धावण्यासाठी शारीरीकदृष्टया सुदृढ आहेत.

दिनांकः

वै़द्यकीय अधिकारी

स्वाक्षरी व शिक्यासह

## प्रपत्र–3

## लहान कुटुंबासाठी प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती/कुमारी ........................................................................................ श्री.........................................................................

यांचा/ यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय......................................... वर्षे ................................ राहणार .................................................

याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो/ करते की,

1. मी ........................................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.
2. आज रोजी मला ................................................. (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक 28.3.2005 नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या आहे (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा).
3. हयात असलेल्या मुलांची संख्या 2 पेक्षा अधिक असले तर दिनांक 28.3.2005 वा तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे-

ठिकाण: उमेदवाराची स्वाक्षरी

उमेदवाराचे पुर्ण नाव:

दिनांक